नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## बिहारमध्ये गोभक्त निवडणूक लढवणार

■ **वृत्तसंस्था, मुझफ्फरपूर, दि. ७ :**

जगद्गुरू शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती महाराज यांनी बिहार विधानसभा निवडणुकीत सर्व जागांवर स्वतंत्र गोपूजक उमेदवार उभे करण्याचा आपला हेतू जाहीर केला आहे.

या घोषणेसह, त्यांनी सनातन धर्माचा प्रचार, गाय मातेचे रक्षण आणि समाजात सांस्कृतिक जागरूकता पसरवण्याच्या उद्देशाने बिहारमध्ये गो मतदार संकल्प यात्रा सुरू केली आहे. एका सभेला संबोधित करताना स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती म्हणाले की, सनातन धर्माचे रक्षण तेव्हाच शक्य आहे जेव्हा आपण गाय मातेचे रक्षण करू. गोरक्षण ही केवळ श्रद्धेची बाब नाही तर ती आपल्या संस्कृती आणि समाजाचा पाया आहे.

* वर्ष ५१ * अंक ९५ * * अमरावती * बुधवार, दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# आशेची किरणे

अखेर शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्र सरकारने मूलभूत कामांकरिता मदत जाहीर केलेली आहे. यावर्षीच्या विनाशकारी पावसाने लाखो एकर जमीन अक्षरशा खरडून गेलेली आहे. हे संकट अभूतपूर्व आहे. आपत्तीग्रस्त परिस्थिती येणे, अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान होणे अशा गोष्टी दर दोन-चार वर्षांनी होतच असतात पण, यावर्षीच्या पावसाने जे काही जबरदस्त नुकसान केलेले आहे. त्यामुळे भविष्यात खरडून गेलेल्या जमिनीवर पुढील काही वर्षे पीक घेणे ही शक्य होण्यासारखी परिस्थिती नाही. या प्रकारच्या अशा मोठ्या नुकसानीची भरपाई पूर्णपणे होऊ शकत नाही पण, तरीही राज्य सरकारने अशा जमिनीच्या दुरुस्तीसाठी ३१ ते ३२ हजार कोटीच्या दरम्यानचे पॅकेज जाहीर केलेले आहे. महाराष्ट्राच्या तिजोरीची सध्याची परिस्थिती काय आहे हे जगात जाहीर आहे. सरकारला शेतकऱ्यांची मागणी १००% मान्य करणे शक्य नाही कारण कुठलीही आपत्तीमध्ये झालेली नुकसानीची गोष्ट असो. त्या होणाऱ्या नुकसानीची संपूर्ण रक्कम कधीच कोणालाही मिळत नसते हे सत्य आपण समजून घेतले पाहिजे. त्या परिस्थितीतही आताच्या घडीला सरकारने जी मदत जाहीर केलेली आहे. ती निश्चितच उल्लेखनीय मानावी लागेल कारण कासावीस झालेल्या शेतकरी बांधवांना ऐन दिवाळीच्या पर्वावर दिवाळे निघण्याची वेळ आल्यासारखे झालेले आहे. लहान शेतकऱ्यांचे तर पार कंबरडेच मोडून गेलेले आहे. आता या सरकारी रकमेचा उपयोग त्याच कामासाठी होईल ज्यायोगे ती जमीन पुन्हा पेरणी योग्य होईल. याचाच दुसरा अर्थ असा की पिकाच्या नुकसानीची भरपाई या मदतीमध्ये समाविष्ट नाही, ती रक्कम कदाचित वेगळी असावी. सध्या शेतीचे दुहेरी नुकसान झालेले आहे त्यामुळे मदतही वेगवेगळ्या प्रकारे मिळालीच पाहिजे. अनेक शेतकऱ्यांनी विमा काढलेला आहे, गेले अनेक वर्ष विमा कंपन्या गडगंज नफा कमावीत आहेत. यावर्षी जल विस्फोटामुळे शेतकऱ्यांच्या नशिबी विस्फोटक स्थिती आणून उभी केलेली आहे. एवढे सर्व झाल्यावरही शेतमालाला पुरेसा कुठेच भाव नाही हे विशेष आहे. ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे त्यांची हतबलता बघून ज्यांचे डोळे पाणावत नाहीत असा माणूस शोधूनही सापडणार नाही. त्यातल्या त्यात या आपत्तीमध्येही जे थोडेफार तथाकथित सुखी असतील, ते सोडल्यास बाकीचे आपद्ग्रस्त निदान सरकारने आपली अडचण जाणून मदत दिली, हे ऐकून त्यांनाही बरे वाटत असेल. आता ज्या ज्या भागांमध्ये पावसाचा उद्रेक झाला आहे त्या ठिकाणच्या पिकांची परिस्थिती आणि पिकांना मिळणारे उत्पन्न यांचा कुठेही ताळमेळ बसत नाही. म्हणजेच बऱ्यापैकी पीकही नाही आणि त्याहून जास्त मोठे दुःख म्हणजे शेतकऱ्यांच्या पिकाला भावही नाही. अशा गोंधळलेल्या परिस्थितीमध्ये सरकारने ज्या पद्धतीने मदतीची घोषणा केलेली आहे त्याबद्दल सरकारचे अभिनंदन केलेच पाहिजे. सरकारच्या या मदतीमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, त्यांच्या जगण्याला निश्चितच दिशा मिळेल. ही फक्त आशेची किरणे आहेत असे आम्हाला वाटते. भविष्यात सरकारकडून आणखीही मदत मिळण्यासाठी वेगवेगळ्या संस्था, संघटना मदत जाहीर करीत आहेत. त्याचाही फायदा मिळावा ही महाराष्ट्राच्या बिगर शेतकरी जनतेची अपेक्षा आहे, यापेक्षा वेगळे काय सांगावे. शेतकऱ्यांच्या टाहोला योग्य ठरवून घेतलेला निर्णय लवकरात लवकर प्रत्यक्षात उतरावा, एवढीच आमची मनापासूनची अपेक्षा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## शेतकऱ्यांसाठी ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर

# सरकारने तिजोरी उघडली

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**

राज्य सरकारच्या मदती कडे आस लावून बसलेल्या पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देत राज्य सरकारच्या वतीने अखेर पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे मोठे पॅकेज आपण शेतकऱ्यांच्या मदतीसाठी देत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा जास्तीत जास्त पैसा दिवाळीच्या आधी, शेतकऱ्यांना देता येईल, असा राज्य सरकारचा प्रयत्न असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रपरिषदेत ही घोषणा केली.

या पॅकेजअंतर्गत शेतकऱ्यांना केवळ जमिनीच्या नुकसानीसाठीच नव्हे, तर घरांचे व जनावरांचे नुकसान भरपाई म्हणूनही मदत मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे नुकसान, वाहून गेलेली जमीन, कोसळलेली घरे आणि मृत जनावरे यासाठी स्वतंत्र अनुदानाचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

ग्रामपंचायत आणि महसूल यंत्रणेकडून पंचनामे पूर्ण होताच संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात थेट आर्थिक मदत जमा केली जाणार आहे. या निर्णयामुळे अनेक शेतकऱ्यांना पुन्हा शेती उभी करण्यास मदत होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

फडणवीस यांनी स्पष्ट केले की, राज्य सरकारकडून केवळ आर्थिक मदतच नव्हे, तर पीक पुनर्लागवड, बी-बियाणे वितरण, सवलतीचे कर्ज आणि कृषी यंत्रसामग्री पुरवठा अशा सर्व बाबींसाठी विशेष योजना सुरू करण्यात येतील. पंचनामे लवकर पूर्ण करून शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदतीची रक्कम जमा करण्यात येईल, असंही त्यांनी सांगितलं.



### २९ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना मिळणार मदत

फडणवीस म्हणाले की, राज्यातील १ कोटी ४३ लाख ५२ हजार हेक्टर जमिनीवर यंदा लागवड झाली होती. त्यापैकी ६८ लाख ७९ हजार ७५६ हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, त्यांच्या पुनर्वसनासाठी राज्य सरकारने तत्काळ मदत कार्याला गती दिली आहे. त्यांनी सांगितले की, ज्या भागात नुकसान झाले आहे, तिथे २९ जिल्हे, २५३ तालुके आणि २०५९ महसूल मंडळांचा समावेश आहे. त्या सर्व भागात मदत पोहोचवण्याचे काम युद्धपातळीवर सुरु असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

## २ सप्टेंबरच्या अध्यादेशाला

# स्थगिती नाहीच!

**उच्च न्यायालयाचा स्पष्ट नकार**

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :**

राज्य सरकारने २ सप्टेंबर २०२५ रोजी ओबीसी प्रवर्गात मराठा समाजासाठी आरक्षणाचा अध्यादेश जाहीर केला होता. या निर्णयाविरुद्ध काही व्यक्तींनी उच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल केल्या होत्या. याचिकांकर्त्यांनी अध्यादेशावर तात्काळ स्थगिती देण्याची मागणी केली असली तरी न्यायालयाने त्याला स्पष्ट नकार दिला. त्यामुळे राज्य सरकार आणि मराठा समाजासाठी हा मोठा दिलासा मानला जात आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत झालेल्या आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयानुसार, हैदराबाद गॅझेटियरच्या नोंदीच्या आधारे कुणबी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यात आले. हा निर्णय जाहीर होताच ओबीसी संघटना आणि काही समाज घटकांनी याला तीव्र विरोध दर्शवला.

त्यांनी हा निर्णय असंवैधानिक असल्याचे सांगत थेट मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, न्यायालयाने सरकारच्या या निर्णयावर तात्काळ स्थगिती देण्यास स्पष्ट नकार दिला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्या. चंद्रशेखर आणि न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने २ सप्टेंबरच्या शासन निर्णयावर अंतरिम स्थगिती देण्याची मागणी फेटाळली. म्हणजेच राज्य सरकारने जारी केलेला हैदराबाद गॅझेटियर अंमलबजावणीचा आदेश अद्याप वैध आणि प्रभावी राहणार आहे. न्यायालयाने या याचिकांवर सविस्तर सुनावणीसाठी तारीख दिली असली तरी, तात्पुरती स्थगिती नाकारल्याने सरकारचा निर्णय यथावत राहिला आहे.

राज्यातील विविध ओबीसी संघटना, जसे की कुणबी सेना, महाराष्ट्र माळी समाज महासंघ, अहिर सुवर्णकार समाज संस्था, महाराष्ट्र नाभिक महामंडळ, तसेच सामाजिक कार्यकर्ते सदानंद मंडलिक यांनी शासनाच्या निर्णयाला विरोध करीत या याचिका दाखल केल्या होत्या. परंतु, त्या कोर्टाने फेटाळून लावल्या.

## तुकडा बंदी अधिनियमात सुधारणा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :**

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून, त्यापैकी दोन प्रमुख निर्णय हे तुकडा बंदी अधिनियम सुधारणा आणि झोपडपट्टी पुनर्वसनामध्ये क्लस्टर योजना लागू करण्यासंदर्भात आहेत.

तुकडा बंदी अधिनियमातील सुधारणेमुळे महाराष्ट्रातील छोट्या प्लॉट धारकांना मोठा दिलासा मिळणार आहे, तर दुसऱ्या निर्णयानुसार एसआरएमध्ये क्लस्टर योजना राबवण्यास मंजुरी मिळाली आहे.

**उद्योग विभाग : राज्याचे रत्ने व दागिने धोरण २०२५ जाहीर**

■ सोने, चांदीचे दागिने, हिरे-रत्ने यांच्याशी निगडीत उद्योग-व्यवसाय वाढीस चालना मिळणार. एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक, पाच लाख नवीन रोजगार निर्मितीचे उद्दीष्टे.

**नगर विकास विभाग : सांडपाण्यावर प्रक्रियेचे धोरण**

■ सांडपाण्यावरील प्रक्रियेमुळे आणि त्याच्या पुनर्वापराद्वारे चक्रीय अर्थव्यवस्थेस चालना. सांडपाण्याचे शाश्वत व्यवस्थापन, पर्यावरण रक्षण, आरोग्यदायी परिसर या संकल्पनेला बळ मिळणार. ४२४ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये धोरण राबवण्यात येणार.

■ अमरावती महापालिकेला केंद्र शासन पुरस्कृत पी.एम.ई बस योजनेअंतर्गत ई-बस डेपो व चार्जिंग व्यवस्थेकरिता मौजा बडनेरा येथील २.३८ हे.आर जमीन ३० वर्षासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय.

■ स्वयंसेवी संस्थांद्वारे चालवण्यात येणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक निवासी आश्रमशाळा, ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठीच्या निवासी आश्रमशाळा तसेच विद्यानिकेतन आश्रमशाळांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना २ लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय. अशा ९८० आश्रमशाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार.

## सरकारच्या मदत पॅकेजवर विरोधकांची टीका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**

महायुती सरकारने अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या मदत पॅकेजवर विरोधी पक्षांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ही मदत तुटपुंजी असून, सरकारने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळल्याची संतप्त टीका करत कर्जमाफीच्या आश्वासनालाही पद्धतशीर बगल दिल्याचा आरोप रोहित पवारांनी केला.

तर हेक्टरी ५० हजार रुपयांची मागणी असताना, केवळ तुटपुंजी मदत जाहीर करून, फसणवीस सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

संपूर्ण कर्जमाफीच्या मागणीला या सरकारने पद्धतशीरपणे बगल दिलीच, पण तोंडाला अक्षरशः पाने पुसली, असे आ. रोहित पवार म्हणाले. महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेताना सरकारच्या हाताला कंप का येतो? असा सवाल सपकाळ यांनी केला.

दुसरीकडे, महायुती सरकार हे शेतकऱ्यांची थट्टा करत आहे, अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली. कर्जमाफी करणार करणार फक्त तारीख पे तारीख सरकार सांगत आहे. पण नेमकी कर्जमाफी कधी देणार हे सरकार सांगत नाही, असेही ते म्हणाले.

# २४,६३४ कोटींच्या ४ नवीन रेल्वे प्रकल्पांना मंजुरी

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली आणि एकूण २४,६३४ कोटींच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, बैठकीत चार नवीन रेल्वे प्रकल्पांना मान्यता देण्यात आली.

यामध्ये मध्य प्रदेशातील इटारसी-भोपाळ-बीना मार्गावरील २३७ किमी लांबीचा चौथा मार्ग आणि गुजरात आणि मध्य प्रदेशला जोडणारा वडोदरा-रतलाम मार्गावरील २५९ किमी लांबीचा तिसरा आणि चौथा मार्ग समाविष्ट आहे.

या प्रकल्पांमध्ये महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात आणि छत्तीसगडमधील १८ जिल्ह्यांचा समावेश असेल. भारतातील सात रेल्वे कॉरिडॉर एकूण रेल्वे वाहतुकीपैकी ४१% वाहतूक करतात आणि हे प्रकल्प या कॉरिडॉरची क्षमता आणि कनेक्टिव्हिटी मजबूत करतील.

वैष्णव म्हणाले की, या प्रकल्पांमुळे केवळ रेल्वेची क्षमता वाढणार नाही तर गर्दी कमी होईल, वेळ वाचेल आणि रेल्वे सेवांची विश्वासार्हता सुधारेल. ते म्हणाले, आम्ही ठरवले आहे की या कॉरिडॉरमध्ये किमान चार आणि शक्य असल्यास सहा मार्ग असतील.

गोंदिया ते डोंगरगड : चौथी लाईन, ८४ किमी (महाराष्ट्र आणि छत्तीसगड)
वर्धा ते भुसावळ : तिसरी आणि चौथी लाईन, ३१४ किमी (महाराष्ट्र)
वडोदरा ते रतलाम : तिसरी आणि चौथी लाईन लाईन, २५९ किमी (गुजरात आणि मध्य प्रदेश)
इटारसी ते भोपाळ ते बिना : चौथी लाईन, २३७ किमी (मध्य प्रदेश) आदिंचा या प्रकल्पात समावेश आहे.

## युपीआय पेमेंटसाठी वापरले जाईल

# चेहरा आणि फिंगरप्रिंट

**नवीन फीचर्सला सरकारची मान्यता**

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :**

युपीआय वापरकर्ते आता त्यांच्या चेहऱ्याचा आणि फिंगरप्रिंटचा वापर करून पेमेंट करू शकतील. केंद्र सरकारने आज, ७ ऑक्टोबर रोजी युपीआय चालवणारी एजन्सी एनपीसीआयच्या नवीन बायोमेट्रिक फीचर्सना मान्यता दिली.

एनपीसीआय लवकरच त्यांच्या वापरकर्ता पुस्तिका आणि अंमलबजावणी तारखेची माहिती जाहीर करेल. त्यात म्हटले आहे की, ही नवीन पद्धत वढक पेमेंट सोपे, सुरक्षित आणि अधिक वापरकर्ता-अनुकूल बनवेल. नवीन फीचर्समुळे युपीआय पेमेंट पर्यायी करण्यासाठी पिनची आवश्यकता कमी होईल. एटीएममधून पैसे काढण्यासाठी आणि युपीआय पिन सेट करण्यासाठी देखील फिंगरप्रिंटचा वापर होणार आहे.

## आयएएस अधिकाऱ्याची आत्महत्या

■ **वृत्तसंस्था, चंदीगड, दि. ७ :**



हरियाणाचे वरिष्ठ आयपीएस अधिकारी वाय. पूरण कुमार यांनी आत्महत्या केली आहे. त्यांनी चंदीगडच्या सेक्टर ११ येथील त्यांच्या सरकारी निवासस्थानी स्वतःवर गोळी झाडून घेतली. पूरण कुमार हे एडीजीपी दर्जाचे अधिकारी होते. २९ सप्टेंबर रोजी त्यांना रोहतकच्या सुनारिया तुरुंगात हलवण्यात आले होते, जेथे डेरा सच्चा सौदा प्रमुख रामरहिम शिक्षा भोगत आहे.




## राज्यात आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :**

राज्य शासनाने आज सात वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश जारी केलेत.

रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम. देवेंद्रसिंह यांची बदली करून त्यांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई येथे सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखरसिंह यांना कुंभमेळा आयुक्त, नाशिक या महत्त्वाच्या पदावर नेमण्यात आले आहे.

नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांची बदली नाशिक महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त म्हणून करण्यात आली आहे. त्यांच्या जागी जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची नाशिक जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांना जळगाव जिल्हाधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे. संजय कोलटे यांची बदली साखर आयुक्त, पुणे या रिक्त पदावर करण्यात आली आहे.

## माणसाची नाही... संविधानाची हत्या

■ **वृत्तसंस्था, रायबरेली, दि. ७ :**



रायबरेलीतील मॉब लिंचिंगबाबत राहुल गांधी म्हणाले, दलित तरुण हरिओम वाल्मिकीची क्रूर हत्या ही केवळ एका माणसाची हत्या नाही, तर मानवतेची, संविधानाची आणि न्यायाची हत्या आहे. या देशात द्वेष, हिंसाचार आणि जमावाला सत्ताधारी पक्षाचे संरक्षण आहे.

राहुल गांधी म्हणाले की, संविधानाची जागा बुलडोझरने घेतली आहे आणि न्यायाची जागा भीतीने घेतली आहे. पण हा देश जमावाच्या इच्छेनुसार नाही, तर संविधानाने चालवला जाईल. भारताचे भविष्य समानता आणि मानवतेवर अवलंबून आहे. मी कुटुंबासोबत उभा आहे. त्यांना नक्कीच न्याय मिळेल. २ ऑक्टोबर रोजी हरिओम पासवानची हत्या करण्यात आली होती.

## २ राज्यांमध्ये कफ सिरपमुळे २३ मुलांचा मृत्यू

**५ राज्यांमध्ये सिरपवर बंदी**

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :**

मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये विषारी कफ सिरप प्यायल्याने आतापर्यंत तेवीस मुलांचा मृत्यू झाला आहे. २ सप्टेंबरपासून मध्य प्रदेशात १९ आणि राजस्थानमध्ये चार मुलांचा मृत्यू झाला आहे. यानंतर, मध्य प्रदेश, राजस्थान, केरळ, तामिळनाडू आणि पंजाबने सिरपच्या विक्री आणि वापरावर बंदी घातली आहे.

या प्रकरणाची सीबीआय चौकशी करावी आणि देशभरातील औषधांच्या सुरक्षिततेची चौकशी करावी अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. वकील विशाल तिवारी यांनी याचिकेत अशी मागणी केली आहे की, न्यायालयाने सरकारला राष्ट्रीय न्यायिक आयोग किंवा तज्ञ समिती स्थापन करण्याचे निर्देश द्यावेत आणि तपास सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या देखरेखीखाली करावा.

दरम्यान, तामिळनाडू ड्रग्ज कंट्रोल डिपार्टमेंटने सिरप बनवणा?या कंपनीला कारणे दाखवा



नोटीस बजावली आहे. कांचीपुरम येथील कंपनी श्रीसन फार्मास्युटिकल्सने कंपनीला नोटीस बजावली आहे. सरकारने पाच दिवसांत कंपनीकडून उत्तर मागितले आहे.

गुजरातमधील दोन कफ सिरप कंपन्यांच्या नमुन्यांमध्ये विषारी डायथिलीन ग्लायकोल आणि इथिलीन ग्लायकोल चे प्रमाण जास्त आढळले. छिंदवाडा येथून १९ औषधांचे नमुने घेण्यात आले. गुजरातमधील रिलाइफ सिरप आणि रेस्पिफ्रेश टीआर सिरपमध्ये अनियमितता आढळून आली आहे.

# शिवसेना कुणाची? आज सुप्रीम कोर्टात अंतिम सुनावणी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**

महाराष्ट्राच्या राजकारणात चर्चेचा विषय असलेल्या 'खरी शिवसेना कुणाची?' या ऐतिहासिक प्रश्नावर आज ८ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयात निर्णायक सुनावणी पार पडणार आहे.

गेली तीन वर्षे चालत असलेल्या या वादावर अखेर उद्या न्या. सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर अंतिम युक्तिवाद होणार असून, त्यानंतर न्यायालय आपला निकाल राखून ठेवेल किंवा तत्काळ जाहीर करेल हे पहावे लागणार आहे. उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे या दोन गटांमध्ये शिवसेनेच्या नाव आणि पारंपरिक धनुष्यबाण चिन्हावरून सुरू असलेला वाद गेली तीन वर्षे सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

शिवसेनेत २०२२ मध्ये मोठी बंडखोरी झाली होती. त्यानंतर फेब्रुवारी २०२३ मध्ये निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील गटाला शिवसेना हे नाव व धनुष्यबाण हे चिन्ह दिले होते. निवडणूक आयोगाच्या या आदेशांना उद्धव ठाकरे यांनी आव्हान दिले होते.




या प्रकरणात अनेक प्राथमिक सुनावण्या झाल्या असून, बुधवारी होणारी सुनावणी ही अंतिम टप्प्यातील निर्णायक कार्यवाही मानली जात आहे. न्यायालयात दोन्ही बाजूंकडून सविस्तर युक्तिवाद पूर्ण झाले असून, आज निकाल लागण्याची शक्यता आहे.

या सुनावणीच्या पार्श्वभूमीवर वकील असीम सरोदे यांनी मोदी आणि शिंदे यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली आहे. शिवसेना धनुष्यबाण चिन्हाबाबत उद्या अंतिम सुनावणी घेणार असे सर्वोच्च न्यायालयाने जाहीर केले आहे. ८ ऑक्टोबरला न्यायाधीश सूर्यकांत नक्की सुनावणी घेतील अशी अपेक्षा आहे. इकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी बांधून तयार नसलेल्या विमानतळाचे नवी मुंबईत दिखाऊ उद्घाटन करणार आणि त्याचवेळी एकनाथ शिंदे यांचे विमान सर्वोच्च न्यायालय जमिनीवर पाडणार का? असा खोचक टोला त्यांनी लगावला आहे.

महासागर
अमरावती
बुधवार, दि. 8 ऑक्टोंबर 2025




# मुख्य न्यायाधीश भूषण गवई यांच्यावर हल्ल्याचा निषेध

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 7)** - सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश भूषण गवई यांच्यावर वकील राकेश किशोर यांनी बूट फेकल्याच्या घटनेचा निषेधार्थ अमरावतीत विविध संघटनांनी मोठ्या प्रमाणावर विरोध प्रदर्शन केले. मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात झालेल्या निदर्शने व मूक सभा यांमध्ये न्यायव्यवस्थेच्या प्रतिष्ठेचे रक्षण करण्यासाठी आणि हल्ल्यामागील मानसिकतेची चौकशी करण्याची मागणी केली गेली.



जिल्हा बार असोसिएशन आणि अमरावती बार असोसिएशनने या घटनेचा तीव्र निषेध केला. निवेदनात म्हटले आहे की, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही देशात न्यायालयात कार्यरत असताना मुख्य न्यायाधीशांवर असा हल्ला करणे हा न्यायव्यवस्थेच्या इतिहासातील कलंक आहे. बार असोसिएशनने हल्ला करणाऱ्या वकिलावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. निवेदन सादर करताना बार सदस्य, माजी पदाधिकारी आणि अनेक वकील उपस्थित होते, तसेच त्यांनी काळ्या फिती बांधून निषेध व्यक्त केला.

याव्यतिरिक्त, डॉ. पंजाबराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने आंबेडकर पुतळ्याजवळ शांततापूर्ण मूक निषेध सभा घेण्यात आली. या सभेत शाहू, फुले आणि आंबेडकरवादी विचारसरणीशी संबंधित नागरिक आणि सामाजिक संघटना मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. अमरावती विधानसभा युवक काँग्रेसने देखील सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि अमरावतीचे अभिमान भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा तीव्र निषेध केला. इर्विन चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर निदर्शने करताना कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्यांनी सांगितले की हा हल्ला फक्त एका व्यक्तीवर नाही तर भारतीय संविधान आणि न्यायव्यवस्थेवर थेट हल्ला आहे.

## सरन्यायाधीश भूषण गवई यांना कडक संरक्षण द्यावे



भारताचे सरन्यायाधीश मा. भूषण गवई यांच्यावर 6 ऑक्टोबर रोजी न्यायालयात मनुवादी आणि जातीयवादी विचारसरणीच्या व्यक्तीने हल्ला करण्याचा प्रयत्न केला, ही अत्यंत गंभीर व चिंताजनक घटना आहे. हा हल्ला केवळ न्यायव्यवस्थेवरच नव्हे, तर भारताच्या लोकशाही आणि संविधानावरचा हल्ला असल्याचे स्पष्ट दिसते. या घटनेतून काही प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांकडून न्यायसंस्थेवर दबाव आणण्याचा निच प्रयत्न होत असल्याचेही प्रकर्षाने जाणवते. भारताची न्यायसंस्था ही लोकशाहीचा महत्वाचा आधारस्तंभ असून, त्यावर कुणाचाही आघात होऊ देणे देशासाठी धोकादायक ठरेल. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेला भ्याड हल्ला अत्यंत निषेधार्ह आहे. केंद्र सरकारने त्वरित याची गंभीर दखल घेऊन त्यांच्या सुरक्षेत वाढ करावी आणि अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी कठोर पावले उचलावीत. संविधानाच्या रक्षणासाठी आणि न्यायसंस्थेच्या सन्मानासाठी देशातील सर्व प्रगतिशील नागरिकांनी एकत्र यावे.

**मधुकरराव अभ्यंकर, जेष्ठ नेते, रिपाई ( गवई गट )**

# उद्रेक : व्हिएमव्हितील विद्यार्थ्यांचा ठिय्या

## ऑनलाईन फी प्रणालीच्या मागणीवरून वादंग



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 7)** - विदर्भ शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयात (व्हीएमव्ही) परीक्षा फी ऑनलाईन भरण्याची मागणी करत विद्यार्थ्यांनी मंगळवारी(दि.7) ठिय्या आंदोलन केले. गेल्या दोन वर्षांपासून ही मागणी प्रलंबित असून, प्रशासनाकडून वारंवार आश्वासन मिळूनही प्रणाली लागू न झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये संताप उसळला.

सकाळी सुमारे दोनशे विद्यार्थी कॉलेज परिसरात जमले. त्यांनी 'फी भरण्याची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन करा' अशी मागणी प्रशासनासमोर केली. यावेळी एका विद्यार्थ्याने मोबाईलवर आंदोलनाचे दृश्य रेकॉर्ड करण्याचा प्रयत्न केला असता, प्राध्यापकांनी मोबाईल हिसकावल्याने काही काळ गोंधळ उडाला. घटनेची



माहिती मिळताच गाडगेनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

## पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

### प्राध्यापकांचा हस्तक्षेप

7 ऑक्टोबर रोजी झालेल्या या आंदोलनादरम्यान प्रा.शिवानंद कुमार यांनी घटनास्थळी येऊन विद्यार्थ्यांशी अरेरावीची भाषा वापरल्याचा आरोप आहे. त्रास होत असेल तर टी.सी. काढून जा, असे वक्तव्य त्यांनी केल्याचे सांगितले जाते. यावेळी एका विद्यार्थ्याने संपूर्ण घटनेचे चित्रीकरण करण्याचा प्रयत्न केला असता, प्रा. कुमार यांनी त्याचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. या दरम्यान काही विद्यार्थ्यांशी धक्काबुक्कीही झाल्याचे सांगितले गेले आहे. विद्यार्थ्यांनी या घटनेची चौकशी करून संबंधित प्राध्यापकावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर परिस्थिती नियंत्रणात आली असून, प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या मागणीकडे सकारात्मकपणे पाहण्याचे आश्वासन दिले आहे.

पोलिस निरीक्षक अतुल वर यांनी सांगितले की, 'ही घटना महाविद्यालय व्यवस्थापनाशी संबंधित असून, विद्यार्थ्यांच्या फी प्रक्रियेविषयी गैरसमज झाल्याने परिस्थिती निर्माण झाली. अद्याप कोणतीही अधिकृत तक्रार प्राप्त झालेली नाही.' दरम्यान, महाविद्यालयाचे संचालक प्रा. सतीश माळोदे यांनी स्पष्ट केले की, 'विद्यार्थ्यांना क्यूआर कोडद्वारे फी भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. मात्र अर्जासोबत लिंक देण्यासाठी सॉफ्टवेअर प्रणाली विकसित करावी लागेल. शासकीय निकषांनुसार प्रक्रिया सुरू असून, विद्यार्थ्यांना अधिक सुविधा देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.'

# नोटा मोजून देतो म्हणून सात हजारांवर हात साफ!

## बँकेत वृद्ध महिलेची रक्कम चोरली

महासागर | प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, (दि. 7)** - बँकेतून काढलेली रक्कम मोजून देतो म्हणून दोन अज्ञात भामट्यांनी हातचलाखीने एका वृद्ध महिलेजवळील सात हजार दोनशे रुपये चोरून दोघे पसार झाले. सोमवार ता. 6 रोजी घडलेल्या या घटनेत जळगाव आर्वी येथील वृद्ध महिला अनुसया घनश्याम शेळके यांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध दत्तापूर पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.



जळगाव येथील अनुसया घनश्याम शेळके (70) यांना घरकुल योजनेतील धनादेश संबंधित भारतीय स्टेट बँकेच्या कृषी शाखेत जमा झाल्याचे समजले असता त्या सोमवारी सकाळी 11 च्या दरम्यान बँकेत आल्या. रीतसर विड्रॉल स्लिप भरून त्यांनी कॅश काऊंटर वरून (दोनशेच्या नोटा) 20 हजार रुपये रक्कम आपल्या हाती घेतली. दरम्यान बँकेत असलेल्या बाकांवर इतर ग्राहकांसह दोन अज्ञात व्यक्ती बसलेले होते. दरम्यान या दोघांनी अनुसया शेळके यांच्यावर पाळत ठेवली होती. अनुसया शेळके कॅश काऊंटरवरून घेतलेली सदरची रक्कम मोजण्यासाठी बँकेत बसून असताना दोघेही आजी तुम्हीची रक्कम आम्ही मोजून देऊ का म्हणत काही क्षणातच त्यांच्या हाती असलेली वीस हजार बंडल हाती घेतले व त्यांना लक्षात येण्याअगोदरच हात चलाखीने बंडलमधून काही रक्कम लंपास केली. अनुसया शेळके यांना संशय आल्याने बँकेत आलेल्या गावातील अजय देशमुख यांना त्यांनी पुन्हा नोटा मोजण्यास सांगितल्या तर त्यामधून पुन्हा रक्कम मोजली असता मधून 7 हजार 200 रुपये कमी आढळून आले. सदरची रक्कम कमी भरल्याने अनुसया शेळके यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. सदर प्रकरणी अनुसया शेळके यांनी दत्तापूर पोलिसांत तक्रार केली असून दत्तापूर पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. ठाणेदार गिरीश ताथोड यांच्या मार्गदर्शनात तपास सुरु आहे.

# तीन आठवड्यात नवीन स्वच्छता टेंडर लावा!




महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 7)** नागरिकांच्या जनहित याचिकेवर (पीएलआय) आज हायकोर्टाने महत्वाचा निर्णय दिला आहे. शहरातील स्वच्छतेच्या कामात सुरू असलेल्या अनियमिततेविरोधात दाखल झालेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने अमरावती महानगरपालिकेला तीन आठवड्यात नवीन स्वच्छता टेंडर प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

शिवाय, सध्या स्वच्छतेच्या कामात गुंतलेल्या ठेकेदारांविरुद्ध डिसिप्लिनरी कारवाई किंवा आवश्यक असल्यास गुन्हा दाखल करण्याचे आदेशही दिले आहेत. नागरिकांनी अनेकदा तक्रारी दिल्या असूनही शहरातील कचरा व्यवस्थापनात सुधारणा झाली नसल्यामुळे ही याचिका दाखल करण्यात आली होती. हायकोर्टाने नगरपालिकेला फटकारत म्हटले की शहरातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणे अमान्य आहे. स्वच्छतेची जबाबदारी प्रशासनाची आहे आणि यात ढिलाई स्वीकारली जाणार नाही. या निर्णयामुळे शहरात नवीन टेंडर प्रक्रिया लवकरच सुरू होणार असून, नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. हायकोर्टाचा हा आदेश महानगरपालिकेसाठी एक वॉर्निंग बेल ठरत असून संबंधित ठेकेदारांवर कारवाईची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे. शहर स्वच्छ आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी प्रशासनाची तत्परता आता सर्वांचे लक्ष वेधून घेईल, आणि हा निर्णय अमरावतीकरांसाठी मोठा दिलासा ठरला आहे.

# कडवी बाजारात अवैध प्लास्टीकवर मनपाची मेगा कारवाई

## पाच ट्रक प्लॅस्टिक जप्त, पाच गोडावून सील





महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 7)**- अमरावती महानगरपालिकेच्या प्लॅस्टिकमुक्त अमरावती या मोहिमेला गती देण्यासाठी आज मंगळवारी कडवी बाजार परिसरात मनपाकडून मोठी धडक तपासणी मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत बंदी घातलेल्या प्लॅस्टिक साहित्याचा तब्बल पाच ट्रक साठा जप्त करुन पाच गोडाऊन सील करण्यात आले. ही आतापर्यंतची शहरातील सर्वात मोठी कारवाई ठरली असून, सध्या तपासणी मोहीम सुरूच आहे. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा (चांडक) यांच्या आदेशानुसार, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक आणि सहाय्यक आयुक्त अविनाश रघटाटे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभाग व स्वच्छता विभागाच्या संयुक्त पथकाने ही मोहीम राबवली. दिनांक 7 ऑक्टोबर रोजी सकाळपासूनच मनपाचे पथक कडवी बाजार परिसरात दाखल झाले. तपासणी दरम्यान व्यापाऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात बंदी घातलेल्या प्लॅस्टिक पिशव्या, एकदाच वापरण्यायोग्य कप, प्लेट्स, ग्लासेस व अन्य साहित्य



साठवून ठेवले असल्याचे आढळून आले. मनपाच्या अधिकाऱ्यांनी तत्काळ ती सामग्री जप्त करून ट्रकद्वारे मनपा डेपोमध्ये वर्ग करण्यात आली. पूर्वसूचना देऊनही काही व्यापारी प्लॅस्टिकचा वापर सुरू ठेवत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर मनपाने ही कठोर कारवाई केली आहे. या मोहिमेत अतिक्रमण निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक व मनपा कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अधिकाऱ्यांनी नागरिक व व्यापाऱ्यांना पुन्हा एकदा आवाहन केले आहे की, राज्य शासनाच्या नियमांनुसार बंदी घातलेले प्लॅस्टिक वापरू नये. प्लॅस्टिकमुक्त अमरावती घडवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त सौ. सौम्या शर्मा चांडक यांनी केले.

# महापालिकेच्या ई-बस डेपो व चार्जिंग सुविधेसाठी बडनेरा येथे जमीन

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 7)** - महापालिकेला केंद्र शासन पुरस्कृत पी.एम.ई बस योजनेतून मिळालेल्या ई-बस डेपो व चार्जिंग सुविधेसाठी मौजा बडनेरा येथील 2 हेक्टर 38 आर जमीन 30 वर्षासाठी उपलब्ध करून देण्याचा राज्य मंत्रिमंडळ निर्णय बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. केंद्र पुरस्कृत पी.एम.ई. बस योजनेंतर्गत अमरावती महापालिकेने ई-बस डेपो व चार्जिंगकरिता जमीनीची मागणी केली होती. त्यानुसार मौजा बडनेरा येथील सर्व्हे क्र. 110 मधील 2.38 हे. आर शासकीय जागा भोगवटदार वर्ग-2 म्हणून महापालिकेला 30 वर्षासाठी मोफत देण्यात येणार आहे. यामुळे अमरावती महापालिकेला ई-बस आणि त्यांच्या चार्जिंगसाठी व्यवस्था निर्माण करता येणार आहे. यामुळे नागरिकांसाठीच्या दर्जेदार प्रवास सुविधेत भर पडणार आहे.

# रेकॉर्डवरील चोरटी महिला अटकेत

## शहर गुन्हे शाखेची कारवाई, सोन्याचे दागिने जप्त

**अमरावती** - फ्रेजरपुरा हद्दीत झालेल्या चोरीच्या गुन्ह्याचा छडा लावत शहर गुन्हे शाखेने एका चोर महिलेस अटक करून तिच्याकडून सोन्याचे दागिने जप्त केले आहेत. ही महिला रेकॉर्डवरील चोरटी असून तिच्यावर यापूर्वीही अमरावती आयुक्तालय हद्दीत अनेक चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले. घटनेत 4 सप्टेंबर रोजी अर्जुन पांडुरंग वाघमारे (रा. जलाराम नगर, अमरावती) हे पत्नीसह अंबादेवीचे दर्शन घेऊन घरी परतले असता त्यांच्या घराचे कुलूप तोडून 6.5 ग्रॅम वजनाचे, सुमारे 66,500 किंमतीचे सोन्याचे दागिने चोरीस गेले होते. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा उघडकीस आणण्यासाठी शहर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी सपोनि मनिष वाकोडे यांच्या पथकाला तपासाची जबाबदारी दिली. गुप्त माहितीच्या आधारे संशयित महिलेला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत तिने गुन्ह्याची कबुली दिली असून तिच्या ताब्यातून 6 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने (किंमत 65,500) जप्त करण्यात आले आहेत.

# उठा पाडूरंगा प्रभात समयो पातला!

## आजपासून गावोगावी काकडा आरतीचा गजर





महासागर | नितीन दुर्बडे

**पथ्रोट, (दि.7)**- उठा पांडुरंगा प्रभात समयो पातला, वैष्णवांचा मेळा गरूडापारी दाटला। वाळवंटापासूनि महाद्वारापर्यंत सुरवरांची मांदी उभे जोडोनि हात । जग जोगी जग जोगी, जाग जाग बोलती। असे अभंग, भूपाळ्या, भजन, वासुदेव, जोगी, आंधळे पांगुळे, मुका बहिरा, गवळणी, रूपक, महाआरती, पसायदानामधून गावोगावी काकडा आरतीचा गजर आजपासून सुरू होणार आहे.

वारकरी संस्कृतीचा पिढ्यानपिढ्या वारसा लाभला आहे. त्यामुळे, महिनाभर चालणाऱ्या काकड आरतीला आज पासून सुरूवात झाली. ग्रामीण भागात कोजागरी पोर्णिमेनंतर काकड आरतीला सुरवात होते.

### पहाटे 5 वाजतापासून सुरवात

मोठ्या संख्येने महिलांची हजेरी काकडा आरतीची सुरुवात पहाटे 5 वाजल्यापासून ते 7 वाजेपर्यंत होते. विशेषत: काकडा आरतीला महिला मोठ्या प्रमाणावर हजेरी लावत असून गावातील तरुण मुले, वयस्कर व्यक्ती व लहान मुले पहाटेपासून आवर्जून उपस्थित राहतात. यावेळी पांडुरंगाचा अभिषेक करून पूजा केली जाते. पूजा करण्याचा मान दररोज गावातील वेगवेगळ्या लोकांना मिळतो. ज्यांचा पूजेचा मान असतो त्या दिवशी त्यांच्या घरातील सर्व परिवार आरतीला उपस्थित राहतो.

ज्येष्ठ ग्रामस्थांच्या पुढाकारात नियोजन गावोगावची सार्वजनिक मंडळे, काकडा आरती सोहळा समिती, भजनी मंडळांसह गावांमधील ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थांच्या पुढाकाराने गावागावांमध्ये काकडा आरतीचे नियोजन करण्यात येते. विठ्ठल नामाचा जप आणि संतांच्या अभंग, ओव्या मोठा ठेवा असून या ठेव्याचे जतन बाराही महिने वेगवेगळ्या धार्मिक उपक्रमातून जतन केले जात असते. सध्या खेडोपाडी काकडा आरती सोहळ्यात गावे दुमदुमून निघनार आहेत. त्रिपुरारी पौर्णिमेला काल्याचे कीर्तन व महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता होते.

# कर्तबगार महिलेसह यंदा कर्तबगार पुरुषही होणार सन्मानित

## श्री शिवाजी शिक्षण संस्थेकडून शेतकऱ्यांसाठी दोन प्रतिष्ठीत पुरस्कारांची घोषणा



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,(दि.7)**- श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने विदर्भातील शेतकरी महिला आणि पुरुषांसाठी दोन प्रतिष्ठीत पुरस्कार सुरु करण्यात आले आहेत. विदर्भातील कर्तुत्ववान महिला शेतकऱ्यांसाठी शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार मागील वर्षापासून देण्यात येत आहे, तर यावर्षीपासून पहिल्यांदाच विदर्भातील कर्तबगार पुरुष शेतकऱ्यांसाठी स्व. शरद जोशी स्मृती उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार सुरु करण्यात आला आहे. हे पुरस्कार शिक्षण महर्षी कृषिरत्न डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंती उत्सवात सन्मानपूर्वक प्रदान केले जातील. याकरिता शेतकऱ्यांनी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी मंगळवारी (दि.7) आयोजित एका पत्रकार परिषदेतून केले.

या वेळी उपाध्यक्ष ॲड.जे व्ही.पाटील पुसदेकर, केशवराव मेटकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य सुरेशराव खोटरे, सुभाषराव बनसोड, सचिव डॉ.वि.गो.ठाकरे, प्राचार्य डॉ.समीर लांडे, प्राचार्य डॉ.नंदकिशोर चिखले, प्राचार्य राजेश खाडे, प्राचार्य अभय ढोबळे, प्राचार्य सी.एम. देशमुख यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

पत्रकार परिषदेत देशमुखांनी सांगितले की, फक्त विदर्भातील प्रत्यक्ष शेती करणाऱ्या महिला व पुरुष शेतकरी पात्र आहेत. यशस्वी उत्पादन, रोपवाटिका, बीजोत्पादन, व्यवस्थापन, साठवणूक, पॅक हाऊस, मूल्यवर्धन, आधुनिक तंत्रज्ञान वापर, दुग्ध व्यवसाय, ठिबक सिंचन, गोबर गॅस, कृषी प्रदर्शन व मेळाव्यात सहभाग या निकषांवर आधारित मूल्यांकन केले जाईल. शेतकरी महिला किंवा पुरुषाने परिसरातील इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले असल्यासही प्रस्ताव पात्र मानला जाईल. शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार= रोख 1,11,111 रुपये, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ. तसेच स्व. शरद जोशी स्मृती उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार (पुरुष)= रोख 1,11,111 रुपये, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप राहील. 28 ऑक्टोबर 2025 पर्यंत प्रस्ताव सादर करायचे आहे. प्रस्ताव मोशी रोड स्थित श्री शिवाजी कृषी महाविद्यालय येथे प्राचार्य कार्यालयात किंवा महाविद्यालयाच्या वेबसाइट [www.ssacpokv.org] (http://www. ssacpokv.org) द्वारे उपलब्ध नमुन्यात पाठवता येतील. संस्थेच्या वतीने शेतकरी महिला व पुरुषांनी या पुरस्कारासाठी मोठ्या संख्येने प्रस्ताव पाठवून शेतीत केलेल्या योगदानाचे सन्मान घेण्याचे आवाहन सस्थेकडून करण्यात आले आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मोर्शी नगर परिषद महिलांचे वर्चस्व

## 12 महिला सदस्य निश्चित | नगराध्यक्षपदही महिलांसाठी राखीव

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, (दि. 7) – मोर्शी नगर परिषदेसाठी होणाऱ्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीत महिलांचे वर्चस्व कायम राहणार आहे. नगराध्यक्षपद आधीच महिलांसाठी राखीव ठरल्यानंतर, आरक्षण सोडतीतून एकूण 12 महिला सदस्य निश्चित झाल्या आहेत. त्यामुळे यंदाही मोर्शी नगरपरिषदेत सत्तेची सूत्रे महिलांच्या हातातच राहणार आहेत.**



नगर परिषदेच्या सभागृह क्रमांक 1 मध्ये दि. 7 ऑक्टोबर रोजी दुपारी 4 वाजता ही आरक्षण सोडत पार पडली. उपजिल्हाधिकारी (रोहयो) ज्ञानेश्वर ध्यार आणि मुख्याधिकारी सुप्रिया टवलारे यांच्या उपस्थितीत सोडत प्रक्रिया पार पडली. नागरिक, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनातील अधिकारी यांच्या उपस्थितीत पारदर्शक पद्धतीने ही सोडत पूर्ण करण्यात आली.

या आरक्षण सोडतीनुसार, महिलांना मोठ्या प्रमाणावर प्रतिनिधित्व मिळाल्याने स्थानिक पातळीवर आनंदाचे वातावरण आहे. समाजाच्या विविध घटकांना न्याय देण्याच्या दृष्टीने आरक्षणाची रचना संतुलित असल्याचे प्रशासनाचे मत आहे. निवडणुकीच्या तयारीसाठी नगर परिषदेने सर्व विभागांना सूचना दिल्या असून, निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक ती तयारी सुरू आहे. यंदाच्या निवडणुकीत महिलांचा सहभाग आणि नेतृत्व आणखी बळकट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### सोडतीचे निकाल असे

प्रभाग 1 अ नामाप्र, 1 ब सर्वसाधारण महिला, 2 अ सर्वसाधारण महिला, 2 ब सर्वसाधारण, 3 अ सर्वसाधारण महिला, 3 ब सर्वसाधारण, 4 अ सर्वसाधारण महिला, 4 ब सर्वसाधारण, 5 अ अनुसूचित जाती महिला, 5 ब सर्वसाधारण, 6 अ अनुसूचित जाती, 6 ब सर्वसाधारण महिला, 7 अ नामाप्र महिला, 7 ब सर्वसाधारण, 8 अ अनुसूचित जमाती, 8 ब सर्वसाधारण महिला, 9 अ नामाप्र, 9 ब सर्वसाधारण महिला, 10 अ नामाप्र, 10 ब सर्वसाधारण महिला, 11 अ नामाप्र महिला, 11 ब सर्वसाधारण, 12 अ नामाप्र महिला आणि 12 ब सर्वसाधारण असे आरक्षण निश्चित झाले आहे.

# विद्यार्थिनी गुलनाज पठाणचे अभिमानास्पद यश!

## लेखा कोषागार विभागात कनिष्ठ लेखापाल पदावर निवड

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे, (दि. 7) –** चांदूर रेल्वे शहराला अभिमान वाटावा असे यश सूर्योदय कॉलनीतील रहिवासी गुलनाज हाफिस खान पठाण हिने मिळविले आहे. तिची नुकतीच लेखा कोषागार विभागात कनिष्ठ लेखापाल पदासाठी निवड झाली असून ती लवकरच नागपूर येथील सहसंचालक, लेखा व कोषागार विभाग रुजू होणार आहे.

या अभिमानास्पद यशानंतर इम्सा अभ्यासिकेत गुलनाजचा उत्साहात सत्कार करण्यात आला. या छोटेखानी पण आनंदमय कार्यक्रमाला अभ्यासिकेचे संचालक राजेश कडू, सामाजिक कार्यकर्ते पप्पू भालेराव, तसेच इम्सा अभ्यासिकेतील विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांकडून गुलनाजचा शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला आणि सर्वांनी तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव केला. गुलनाज पठाण ही 2015 च्या इम्सा कोचिंग क्लासेसच्या पहिल्या बॅचची विद्यार्थीनी असून तिने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील आणि शिक्षकवृंदांना दिले. तिच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास आणि डोळ्यांतील चमक हेच तिच्या मेहनतीचे प्रतीक होते. तिच्या या प्रेरणादायी वाटचालीमुळे इम्सा अभ्यासिकेचे नाव पुन्हा एकदा उजळले आहे.



### कोणतीच परीक्षा कठीण नसते....!

जिद्द, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवलात तर कोणतीच परीक्षा कठीण नसते. मी आज जे काही आहे ते माझ्या पालकांच्या आशीर्वादाने आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनानेच. असे मत गुलनाज हाफिस खान पठाण हिने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना व्यक्त केले.

# वादातून ग्राहकाच्या पोटात चाकू

## हॉटेल मालकासह दोन महिलांविरुद्ध गुन्हा दाखल

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, (दि. 7) –** शहरातील रिंगरोडवरील हॉटेल हंडी हन्ट येथे घडलेल्या धक्कादायक प्रकारात मित्राचा वाद सोडविण्यास गेलेल्या ग्राहकाच्या पोटात हॉटेल मालकानेच चाकू भोसकल्याने एक जण गंभीर जखमी झाला आहे. या घटनेने शहरात खळबळ उडाली असून गाडगेनगर पोलिसांनी मालकासह दोन महिलांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. गुन्हा रोहित सेंडे आणि दोन अनोळखी महिलांविरुद्ध नोंदविण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नवरात्रोत्सव संपल्यामुळे ओम हरिचंद्र कोठे व त्याचे काही मित्र जेवणासाठी रिंगरोडवरील कास्तकार हॉटेलमध्ये गेले होते. त्याचवेळी शेजारील हंडी हन्ट हॉटेलमध्ये त्यांचा मित्र सनी गायकवाड याचा हॉटेल मालकाशी वाद सुरु असल्याचे दिसून आले. वाद मिटविण्यासाठी ओम व त्याचे मित्र आत गेले असता, रोहित सेंडे याने आतमधून दोन महिलांना बोलावले. त्यांनी ओमचे हात पकडले आणि त्यानंतर रोहितने चाकू काढून थेट ओमच्या पोटात भोसकला. अचानक झालेल्या या हल्ल्यात ओम गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात कोसळला.

# मोर्शी तालुक्यात संत्रा गळतीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान

## सर्वेक्षणासाठी बागांमध्ये पाहणी

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, (दि. 7)–** तालुक्यात आंबिया संत्रा बागांमध्ये फळगळ मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान मोठे झाले आहे. भरपूर मेहनत करून केलेल्या उत्पादनाचे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. प्रशासनाकडून मोर्शी व वरूड तालुक्यातील संत्रा बागांची पाहणी आणि सर्वेक्षण आज करण्यात आले. या वेळी तालुका कृषी अधिकारी पुरुषोत्तम माने, कृषी पर्यवेक्षक फुले, कृषी सहाय्यक अंधारे यांसह संत्रा उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सर्वेक्षणादरम्यान गळतीमुळे झालेल्या नुकसानीची वस्तुस्थिती पाहिली गेली, कारणे तपासली गेली आणि संभाव्य उपाययोजना याबाबत मार्गदर्शन दिले गेले. शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष देण्याचा आणि नुकसान भरपाईची यंत्रणा सुनिश्चित करण्याचा हा महत्वाचा प्रयत्न मानला जात आहे.या सर्वेक्षणातून शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळावी आणि त्यांच्या नुकसानाची योग्य दखल घेऊन उपाययोजना राबविली जावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे संत्रा गळतीचे सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी केली होती, हे विशेष.

# यशस्वी बालकलाकार अनुश्रीचे केले अभिनंदन

महासागर | प्रतिनिधी

**वरूड, (दि. 7)–** तालुक्यातील बेनोडा (शहीद) येथील बालकलाकार अनुश्री प्रिया मंगेश राऊत हिने अल्पावधीतच अभिनय क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. कलर्स वाहिनीवरील लोकप्रिय मालिका 'डोरी सीजन 2' मधील तिच्या प्रभावी भूमिकेनंतर अनुश्रीने आता जाहिरात विश्वात पदार्पण केले आहे. ती लवकरच नामांकित फुरलेनको फर्निचर च्या जाहिरातीत झळकणार असून, तिच्या कलात्मक प्रवासासाठी जामगाव सेवा सहकारी सोसायटीचे संचालक विलास पाटील प्रवीण सावरकर आणि सामाजिक कार्यकर्ते निकु बावणे यांनी अनुश्रीची भेट घेऊन तिचा सत्कार केला व भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी तिचे आई-वडील प्रिया व मंगेश राऊत उपस्थित होते. अनुश्रीच्या या यशाने बेनोडा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



तिच्या मेहनतीला आणि गुणांना मिळालेल्या या संधीबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले असून, लहान वयात मिळवलेले हे यश तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी पायाभूत ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# मुख्य न्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध

## अचलपूरमध्ये नागरिकांचा संताप ■ एसडीओंना निवेदन

महासागर | प्रतिनिधी

**अचलपूर, (दि. 7)–** सुप्रीम कोर्टाचे कामकाज सुरू असताना 71 वर्षीय वकील राजेश रघुराज किशोर या व्यक्तीने भारताचे मुख्य न्यायाधीश भूषण गवई यांच्यावर न्यायालयातच बूट फेकण्याचा प्रयत्न केला. या घटनेदरम्यान त्या व्यक्तीने सनातन धर्म का अपमान नही सहेगा हिंदुस्तान अशा भडक घोषणा देत वातावरण तापवले. या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत अचलपूर दीक्षाभूमी स्मारक समिती यांच्या वतीने आज नागरिक व वकील संघाच्या प्रतिनिधींनी अचलपूर उपविभागीय अधिकारी (एसडीओ) यांना निवेदन सादर केले. या निवेदनात म्हटले आहे की, मुख्य न्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेला हल्ला हा न्यायव्यवस्था, लोकशाही आणि बौद्ध समाजावर झालेला नियोजित कट आहे. हल्ल्यामागील सूत्रधारांचा शोध घेण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी समिती नेमावी, अशी मागणीही करण्यात आली. निवेदनात पुढे म्हटले आहे की, अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत म्हणून शासनाने कठोर कायदे करावेत व भूषण गवई यांच्या सुरक्षेत वाढ करावी, तसेच सेवानिवृत्तीनंतरही सुरक्षा पुरवावी. या प्रसंगी किशोर मोहोड, ॲड. प्रभाकर मोहोड, सुनील जवंजाळ, पुंडलिकराव वानखडे, ॲड. सुभाष चावरे, प्रा. डॉ. रमेश बडगे, दीपक दांडगे, ॲड. अमोल जवंजाळ, निलेश वानखडे आदींसह अनेक नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. अचलपूर शहरात या घटनेविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.



# चांदूर रेल्वेत जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन

**चांदूर रेल्वे –** वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ज्येष्ठ नागरिक संघ, चांदूर रेल्वे यांच्या वतीने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम स्थानिक सुभाष मंडळ सभागृहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य विश्वास दामले होते, तर प्रमुख अतिथी म्हणून माजी नगराध्यक्ष प्रभाकर वाघ, माजी प्राचार्य प्रसेनजित तेलंग, संघाचे अध्यक्ष हरिहर म्हसतकर, उपाध्यक्ष रामकृष्ण अनकर व ज्येष्ठ पत्रकार उत्तमराव गावंडे उपस्थित होते. प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व तुकडोजी महाराज आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. दिवंगत सभासदांना श्रद्धांजली अर्पण केल्यानंतर प्रास्ताविक हरिहर म्हसतकर यांनी केले. ज्येष्ठ नागरिक साहेबराव बेलसरे, सुधाकर वानरे, रमेश राऊत आणि विजया म्हसतकर यांच्या कार्याचा गौरव शाल-श्रीफळ देऊन करण्यात आला.

# दुर्गा विसर्जनादरम्यान दोन युवकांचे प्राण वाचविले

## नावचालक स्वप्नील केवदे यांच्या समयसूचकतेमुळे कौंडण्यपूर येथे मोठा अनर्थ टळला

महासागर | प्रतिनिधी

**कौंडण्यपूर, (दि. 7) –** श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथील वर्धा नदीच्या घाटावर दुर्गादेवी विसर्जनादरम्यान दोन युवक पाण्यात बुडत असताना नावचालक स्वप्नील केवदे यांनी दाखविलेल्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला. त्यांच्या समयसूचकतेमुळे दोघांचे प्राण वाचले असून परिसरात त्यांच्या धाडसाचे कौतुक होत आहे.

अकोल्यातील एका दुर्गा मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सकाळी सुमारास दहा वाजता दुर्गादेवीच्या मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी कौंडण्यपूर घाटावर आले होते. विधिवत पूजनानंतर मूर्तीचे नदीपात्रात विसर्जन सुरू असताना दोन युवकांचा तोल जाऊन ते पाण्यात बुडू लागले. ही धोकादायक परिस्थिती ओळखून नावचालक स्वप्नील केवदे यांनी क्षणाचाही विलंब न करता धाडसाने आपली नाव पाण्यात उतरवली आणि तत्परतेने त्या दोन्ही युवकांना बाहेर काढले. काही क्षणात घडलेल्या या प्रसंगामुळे घाटावर उपस्थित भाविक आणि विसर्जनासाठी आलेले कार्यकर्ते हादरून गेले होते. मात्र स्वप्नील यांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला. या घटनेनंतर परिसरात नावचालक स्वप्नील केवदे यांच्या धाडसाचे आणि तत्परतेचे कौतुक होत आहे. नदीपात्रात अशा प्रसंगी सावधगिरी आणि दक्षता आवश्यक असल्याची जनजागृती या प्रसंगातून झाली आहे. धार्मिक उत्सवांच्या काळात अशा अपघातांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रशासनाकडून सुरक्षा उपाययोजना काटेकोरपणे राबविण्याची मागणीही स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

# आत्मनिर्भर भारताचा संकल्पनेतून संसद स्वदेशी मेळावा

## 10 ते 12 ऑक्टोबरदरम्यान तीन दिवसीय प्रदर्शन व विक्री महोत्सव

महासागर | प्रतिनिधी

**वरूड, (दि. 7) –** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेला चालना देण्यासाठी वरूड येथे संसद स्वदेशी मेळावा या भव्य प्रदर्शन व विक्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा तीन दिवसीय मेळावा दि. 10 ते 12 ऑक्टोबरदरम्यान वरूड येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संत्रा लिलाव मंडी येथे भरविण्यात येणार आहे.

'प्रत्येक घरी स्वदेशी'हा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या मेळाव्यात स्वदेशी उत्पादनांचे प्रदर्शन आणि विक्री केली जाणार आहे. हस्तकला वस्तू, शेती उपयोगी साधने, पारंपरिक खाद्यपदार्थ, बांबू निर्मित उत्पादने, स्वदेशी इलेक्ट्रॉनिक वस्तू, तसेच नवउद्योजकांना मार्गदर्शन देणारे स्टॉल्स यांचा समावेश असेल. महिला बचत गटांना या मेळाव्यात विशेष प्रोत्साहन देण्यात आले आहे. महिलांच्या हातून तयार झालेल्या वस्तू विक्रीसाठी उपलब्ध असतील, तसेच सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजनही होणार आहे. या मेळाव्यामुळे स्थानिक उद्योजक, महिला गट आणि तरुण उद्यमींना आपल्या उत्पादनांची बाजारपेठ मिळणार असून ग्रामीण उद्योजकतेला नवे बळ मिळेल. स्वदेशी उत्पादनांचा प्रसार हा राष्ट्रनिर्मितीचा मार्ग आहे, असे प्रकल्प संयोजक विक्रम ठाकरे यांनी सांगितले.

# एन.एस.एसच्या विद्यार्थ्यांनी श्रमदान करून लावला स्वच्छतेला हातभार

## महाविद्यालय परिसरात राबवले स्वच्छता अभियान

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, (दि. 7)–** स्वच्छता ही सेवा अभियान 2025 अंतर्गत भारत सरकार युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय व उच्च व तंत्र शिक्षण विभाग राष्ट्रीय सेवा योजना कक्ष महाराष्ट्र शासन यांच्या सुचने प्रमाणे लाहोटी महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

याप्रसंगी रासेयो च्या विद्यार्थ्यांनी परिसरात स्वच्छता केली तसेच प्लास्टिक चे निर्मूलन केले. विद्यार्थी दशेपासूनच स्वच्छतेवर भर असावी,समाजसेवे बद्दल आत्मीयता वाढावी या उद्देशाने स्वच्छता ही सेवा या अभियाना अंतर्गत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.एन. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ अविनाश उल्हे, यांच्या नेतृत्वात श्री आर.आर लाहोटी महाविद्यालयाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एन. चौधरी,एन एस एस अधिकारी डॉ. अविनाश उल्हे, डॉ.विजया चव्हाण, डॉ. आतिश कोहळे, डॉ अश्विन लुंगे, शेखर चौधरी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



# चांदूर रेल्वे येथे लवकरच उभारले जाणार प्रशस्त बसस्थानक – आ. प्रताप अडसड

## आणखी 5 नवीन बसेस नागरिकांच्या सेवेत दाखल





महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे, (दि. 7) –** चांदूर रेल्वे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत मोठी भर घालणारा उपक्रम राबविण्याचा संकल्प आमदार प्रताप अडसड यांनी व्यक्त केला आहे. येथील एसटी आगारात लवकरच सर्व सुविधायुक्त प्रशस्त बसस्थानक उभारले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

सोमवारी (ता. 6) चांदूर रेल्वे एसटी आगारात आयोजित कार्यक्रमात आमदार अडसड यांच्या हस्ते पाच नवीन बसेसचे लोकार्पण करण्यात आले. काही महिन्यांपूर्वीच आगाराला पाच नवीन बसेस मिळाल्यानंतर आता आणखी पाच बसेसची भर पडल्याने प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. ग्रामीण भागातील नागरिक आजही 'लालपरी'वर विश्वास ठेवतात, याची दखल घेत आमदार अडसड यांनी परिवहन मंत्र्यांकडे सातत्याने पाठपुरावा करून या बसेस मिळविण्यात यश मिळवले. या लोकार्पण सोहळ्याला भाजपा शहराध्यक्ष नंदा वाधवानी, तालुकाध्यक्ष विवेक चौधरी, पप्पू भालेराव, डॉ. सुषमा खंडार, आगार व्यवस्थापक जयंत झाडे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कर्मचारी व प्रवासी उपस्थित होते. नवीन बसेसच्या उपलब्धतेमुळे मतदारसंघातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होईल, तर नव्या बसस्थानकाच्या उभारणीमुळे प्रवाशांना सर्व सुविधा एका छताखाली मिळतील, हे विशेष.

# चिखलदरा नगरपालिकेचे आरक्षण जाहीर

## महिलांसाठी दहा जागा राखीव, चुरशीची होणार निवडणूक



महासागर | प्रतिनिधी

**चुरणी, (दि. 7) –** चिखलदरा नगरपालिकेच्या 2025 मधील निवडणुकांसाठीची आरक्षण सोडत अखेर जाहीर झाली असून, या वेळी नगरपालिकेत महिलांचे वर्चस्व राहणार आहे. एकूण 20 नगरसेवक जागांपैकी तब्बल 10 जागा महिलांसाठी राखीव ठरल्यामुळे, राजकीय समीकरणांमध्ये बदलाची शक्यता निर्माण झाली आहे.

ही सोडत उपजिल्हाधिकारी विवेक जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी तहसीलदार जीवन मोरणकर, नगरपालिकेचे मुख्याधिकारी व प्रशासक धीरज गोहाड तसेच सर्वच पक्षांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. चिखलदरा नगरपरिषद दहा प्रभागांत विभागली असून, प्रत्येक प्रभागातून दोन नगरसेवक निवडले जाणार आहेत. या सोडतीत अनुसूचित जाती-जमाती, मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण वर्ग अशा विविध प्रवर्गांचे संतुलन राखण्यात आले आहे. नगराध्यक्ष पदासाठी सर्वसाधारण प्रवर्ग जाहीर झाल्याने अनेक इच्छुक उमेदवारांसाठी ही आनंदाची बातमी ठरली आहे.

महिलांसाठी निम्म्या जागा राखीव ठरल्यामुळे आगामी निवडणुकीत महिला नेतृत्वाचा प्रभाव स्पष्टपणे जाणवेल. काही अनुभवी पुरुष नेत्यांना या आरक्षणामुळे धक्का बसला असला, तरी नव्या महिला चेहऱ्यांना राजकारणात संधी मिळणार आहे. चिखलदरा नगरपालिकेची ही निवडणूक नव्या राजकीय समीकरणांसह अधिक चुरशीची आणि रंगतदार होणार आहे, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

### असे निघाले आरक्षण

| प्रभाग क्रमांक | आरक्षित प्रवर्ग ( पहिली जागा ) | आरक्षित प्रवर्ग ( दुसरी जागा ) |
|---|---|---|
| 1 | अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) | सर्वसाधारण (महिला) |
| 2 | अनुसूचित जमाती (महिला) | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| 3 | अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) | सर्वसाधारण |
| 4 | अनुसूचित जमाती (महिला) | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| 5 | अनुसूचित जाती (महिला) | सर्वसाधारण |
| 6 | अनुसूचित जाती (महिला) | सर्वसाधारण |
| 7 | अनुसूचित जाती (सर्वसाधारण) | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| 8 | अनुसूचित जाती (महिला) | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| 9 | अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| 10 | अनुसूचित जमाती (महिला) | सर्वसाधारण |

